# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/09/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील सिडको कॉलनी प्लॉट नं 67 जी सातगाव ता. हिंगणा जि. नागपुर येथे दिनांक 07/09/2021 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. भानवती कुवरसींह उईके वय 45 वर्ष रा. सिडको सातगाव ता. जि. नागपुर यांचा मानलेला भाउ नामे– अभय सोनार(जखमी) यास आरोपी नामे– आशिष सुरेश बोरसरे वय 26 वर्ष, रा. वर्धमान नगर, बुटीबोरी याने अज्ञात कारणवरूना जिवे ठार मारण्याचे उददेशाने विटने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. राकेश साखरकर मो नं 7350902100 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 1.5 कि. मी. अंतरावरील प्लॉट नं. 44 गुरारीकर लेआऊट महालक्ष्मी नगर ता. सावनेर येथे दिनांक 09/09/2021 चे 01:00 वा. ते 04:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगीराज धनराज आसोले वय 53 वर्ष, रा. प्लॉट नं. 44 गुरारीकर लेआऊट महालक्ष्मी नगर, ता. सावनेर हे आपले डब्लुसीएल खदान मध्ये कामावर गेले असतांना फिर्यादीची पत्नी व मुलेही घरातील बेडरूमध्ये घराची कडी लावुन झोपले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे खिडकीवाटे हात घालून दरवाजाची कडी उघडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील देवघरात असलेल्या लोखंडी कपाटातुन सोन्याचे व चांदीचे दागीने कि. 90,480/–रू. व हॅगरला अडकवलेल्या पॅटच्या खिशातुन रोख 4,200/–रू. असा एकुण 94,680/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सागर कारंडे पो.स्टे.सावनेर मो.नं. 7722011228 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत पॉवर प्लॉन्ट खापरखेडा येथे दिनांक 25/8/2021 चे 10.00 ते 08/09/2021 चे 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रशांत कुमार बेहरा, वय 37 वर्ष, रा. भुनेश्वर, राज्य उडीसा ह.मु. लेबर ग्रीन मॉर्डन स्कुल पांजरा कोराडी हे कंपनीमध्ये स्टोर इन्चार्ज म्हणुन काम करीत असून त्यांचे अडरमध्ये कोराडी प्लॉन्ट असुन फियादीने त्यांचा कंपनीच्या कामाकरीता कनव्हेरप्लॅट मध्ये लावण्याकरीता गाईड रोलर 108 बाय 300 के 130 नग और रोलर 250 बाय 132 के 24 नग आर्डर केले होते. नमुद माल कंपनी च्या गोडावुन मध्ये ठेवले होते. फियादी हे नेहमी वरील मालाची तपासनी करीत होते दि 25/08/21 रोजी 10.00 वा. त्यांनी वरील माल गोडावुन बघितल्या होता त्यानंतर गोडावुन मध्ये ठेवलेल्या माल पैकी 1) गाईड रोलर 108 बाय 300 के 120 नग प्रत्येकी कि 20,000/–रू. असा एकुण 24,00000/–रू., 2) रोलर 250 बाय 132 के 08 नग प्रत्येकी कि. 30,000/–रू. असा 2,40,000/–रू. असा एकुण कि. 26,40,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने गोडावुनचे टिनाचा पात्र तोडुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री निमगडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर